पूर्णम इकोव्हीजन फाऊंडेशन

# पूर्णमिदं

VOLUME 2 ISSUE 1 JANUARY-FEBRUARY 2020









## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| पूर्णमचे उपक्रम | २ |
| फोटो गॅलरी | ३ |
| पाणथळ परिसंस्था | ४ |
| सेवा स्वच्छता दूत | ५ |
| विज्ञान दिनाचे महत्व | ६ |
| बागेची सोबत | ७ |
| प्रतिक्रिया | |

## *संपादकीय*

सप्रेम नमस्कार,
सगळ्यांना नवीन वर्षाच्या पूर्णम परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा.
२०२० मधील पहिलाच म्हणजे जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्याचा अंक प्रकाशित करत आहोत.
सगळ्यांना कल्पना आहेच की २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. या वर्षीच्या विज्ञान दिवसाचा विषय आहे . विज्ञानातील महिलांचे योगदान' याच आधारावर आम्ही आपल्यासमोर महिलांनी लिहिलेले ३ वाचनीय लेख या अंकात देत आहोत.
'विज्ञान दिनाचे महत्त्व' या लेखात विज्ञान दिन कधी सुरू झाला आणि आजच्या विद्यार्थ्यांना त्याबद्दल काय वाटते हे एका शालेय विद्यार्थिनीने लिहीलं आहे.
२ फेब्रुवारी हा पाणथळ जागा दिवस म्हणून ओळखला जातो. पाणथळ परिसंस्था या लेखात पाणथळ जागांचे महत्त्व आणि दुर्लक्ष झाल्यास घडलेल्या दुर्घटना वाचा.

विज्ञान हे काही फक्त पुस्तकात वाचण्यासाठी नसून तो रोजच्या जगण्याचा एक भाग आहे. हे व्यंकटेश शरविलच्या सौ. मनिषा काळे यांनी कृतीतून दाखवून दिलंय.नैसर्गिक साधनांचा वापर काळजीपूर्वक करत त्यांनी घरात छोटेखानी जैवविविधता बागच साकारली आहे.

स्वच्छता हा शाश्वत जीवनशैलीचाच एक भाग आहे. भारतात होऊन गेलेल्या अनेक थोरामोठ्यांनी आरोग्याचे, स्वच्छतेचे महत्त्व आपल्याला पटवून दिलंय. २३ फेब्रुवारी रोजी गाडगे बाबा जयंतीच्या निमित्ताने सौ. शोभा कुलकर्णी यांनी संत गाडगेबाबा यांचा आयुष्यपट आपल्या लेखनातून थोडक्यात मांडला आहे.

पूर्णम चे अविरत सुरू असणारे काम आणि त्यात मिळणारे आपल्या सर्वांचे सहकार्य हे खूप मोलाचे आहे. या दोन महिन्यात e waste हे २.६ टन तर ७५९ किलोग्राम प्लास्टिक कचरा संकलित झाला. त्याचाही थोडक्यात आढावा घेऊ. असे म्हणतात की नवीन गोष्ट राबवण्यासाठी त्याची लहान मुलांमध्ये जागृती निर्माण व्हायला हवी म्हणून पूर्णम अनेक शाळांमध्ये सुध्दा कचरा व्यवस्थापनाबद्दल उपक्रम राबवत असते. यामध्ये अनेक शाळांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. इ कचऱ्यातील टाकाऊ मधून टिकाऊ वस्तू तयार करण्याच्या स्पर्धेला सुद्धा भरभरून प्रतिसाद मिळाला. २२ फेब्रुवारी रोजी यातील निवडक वस्तूंचे प्रदर्शन भरवण्यात आले, त्यासही पुणेकरांनी उत्तम प्रतिसाद दिला. आम्ही पूर्णम परिवारातर्फे या शाळांतील विद्यार्थी, शिक्षक, पालक यांना धन्यवाद देतो. असे उपक्रम उद्याच्या नागरिकांसाठी पुढेही मार्गदर्शक ठरतील अशी खात्री बाळगतो.

पूर्णम च्या कामाबद्दल नागरिकांचा अभिप्राय सुद्धा या अंकात दिला आहे. आम्ही असे आवाहन करतो की आपणही आमच्या कामाबद्दलचा अभिप्राय कळवावा.

धन्यवाद,



**सौ. राखी कुलकर्णी**
**(content@poornamecovision.org)**

# पूर्णमचे दोन महिन्यातील उपक्रम

## इ-कचरा व प्लास्टिक व्यवस्थापन प्रकल्प

कमिन्स फाऊंडेशनच्या सहयोगाने पूर्णम साप्ताहिक केंद्रे चालवून व विविध स्तरावर संकलन मोहिमा आयोजित करून इ-कचरा आणि प्लास्टिक संकलित करते. १२ साप्ताहिक केंद्रे, ३ प्रभाग स्तरावरील मोहिमा, १ व्यावसायिक ठिकाणची मोहीम आणि २ सोसायटी स्तरावरील संकलन मोहिमांमधून एकूण २.६ टन इ-कचरा व ७५९ किलो प्लास्टिक संकलन केले गेले. पूर्णम इ-कचऱ्यातून दुरुस्त होण्यासारख्या वस्तू वापरण्यायोग्य बनवून देणगीदाखल गरजू शाळांना देते. याच उपक्रमांतर्गत रायरेश्वर येथील जिल्हा परिषद शाळेला एक संगणक संच पूर्णम आणि कमिन्स यांच्यातर्फे भेट देण्यात आला.

## जुने कपडे संकलन व पुनर्वापर

सुमारे ४१० किलो जुने कपडे संकलित झाले व एकूण ५ नवीन उत्पादनांची निर्मिती केली गेली. मकरसंक्रांतीनिमित्त काही नव्या व जुन्या वस्तूंची निर्मिती केली गेली. संक्रांतीचे वाण म्हणून पर्यावरणपूरक वस्तू लुटणे ही कल्पना तशी नवीन आहे. तरीही महिलांचा प्रतिसाद उत्तम मिळाला. पूर्णमच्या उत्पादनांची विक्री विविध स्तरावर स्टॉलद्वारे केली जाते. गेल्या दोन महिन्यात ३ ठिकाणी स्टॉलद्वारे विक्री झाली. त्यामध्ये भावे हायस्कूल (सदाशिव पेठ), सेवासंगम प्रदर्शन (गणेश कला क्रीडा) आणि मोशूज हेल्थ पॉप अप (कोरेगाव पार्क) यांचा समावेश होता.

## सॅनिटरी नॅपकीन प्रकल्प

फलटण तालुक्यातील सासवड गावात कमिन्सच्या मदतीने महिला बचत गटाच्या माध्यमातून स्वस्त दराचे सॅनिटरी नॅपकीन बनवून त्याची विक्री करण्याचा प्रकल्प राबविला जातो. या प्रकल्पांतर्गत विविध ठिकाणी जनजागृती कार्यक्रम घेऊन विक्री केली जाते. एकूण ८०७५ सॅनिटरी नॅपकीन्सची निर्मिती झाली आणि ४०४४ नॅपकीन्सची विक्री झाली. जनजागृती संदर्भात तरडगाव व हिंगणगाव येथील अंगणवाडी तसेच महिला बचत गटांशी बैठका घेण्यात आल्या.

पुण्यामध्ये प्रभाग क्र. ३४ मध्ये महानगरपालिका, ARAI आणि सेवावर्धिनी यांच्या मदतीने सॅनिटरी नॅपकीन डिस्पोजल प्रकल्प सुरु आहे. त्याअंतर्गत सोसायटी स्तरावर १९० कलेक्शन पॉईंट्सवरून कलेक्शन केले जाते. गेल्या दोन महिन्यात मिळून एकूण १८१९७ सॅनिटरी नॅपकीन्स संकलित करून त्यांची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली.

## ग्रीन कन्सल्टन्सी

पुणे शहरामध्ये सोसायटी स्तरावर कम्पोस्टिंग व पर्जन्यजल संधारण (रेनवॉटर हार्वेस्टिंग) प्रकल्पांसाठी मार्गदर्शक म्हणून ग्रीन कन्सल्टन्सी हा पूर्णमचा उपक्रम आहे. या अंतर्गत पुण्यातील ४ सोसायट्यांमध्ये खताचे प्रकल्प आणि २ सोसायट्यांमध्ये पर्जन्यजलसंधारणाचे (रेनवॉटर हार्वेस्टिंग) युनिट चालविले जातात.

वाळुज एमआयडीसी मध्ये महिंद्रा वेस्ट टू एनर्जी सोल्युशन्स आणि वाळुज एमआयडीसी च्या सहयोगाने पूर्णम कचरा व्यवस्थापनाचा प्रकल्प राबविते. यादवारे एमआयडीसीतील रहिवासी तसेच औद्योगिक कंपन्यांकडून ओला, सुका कचरा आणि गार्डन वेस्ट गोळा केले जाते. ओला कचरा महिंद्रा कंपनीच्या सीएनजी बनविण्याच्या प्लांटला दिला जातो. सुक्या कचऱ्यातील रिसायकलिंग होऊ शकणारे घटक रीसायक्लर्सकडे सुपूर्त केले जातात व उरलेला कचरा भराव क्षेत्रात जातो. गेल्या दोन महिन्यामध्ये 332 टन ओला, 173 टन सुका व 17 टन गार्डन वेस्ट जमा केले गेले.

## जनजागृती प्रकल्प

जनजागृती प्रकल्पांतर्गत विविध स्तरांवर पर्यावरण आणि कचरा व्यवस्थापनविषयक अनेक उपक्रम राबविले जातात. शाळा-कॉलेज स्तरांवर जनजागृती कार्यक्रम, व्याख्याने, स्पर्धा इत्यादी उपक्रम आयोजित केले जातात. तसेच वस्ती पातळीवर महिला व मुलांसाठी वैयक्तिक स्वच्छता, परिसराची/घराची स्वच्छता आणि कचरा वर्गीकरण व व्यवस्थापन इत्यादी विषयांवर कार्यक्रम घेतले जातात. गेल्या दोन महिन्यांमध्ये कमिन्स कंपनीच्या सहयोगाने ३० शाळांमध्ये इ-कचरा व प्लास्टिक संदर्भात व्याख्याने आणि विविध स्पर्धा आयोजित केल्या गेल्या. स्पर्धांमध्ये निबंध, चित्रकला व 'बेस्ट आउट ऑफ इ-वेस्ट' अशा उपक्रमांचा समावेश होता. 'बेस्ट आउट ऑफ इ-वेस्ट' स्पर्धेमध्ये सहभाग घेतलेल्या १० शाळांमधून १०१ वस्तू निवडल्या गेल्या. दिनांक २२ फेब्रुवारी रोजी त्या वस्तूंचे प्रदर्शन नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ येथे आयोजित करण्यात आले.

सेवासहयोग संस्थेच्या सहकार्याने वस्ती पातळीवर प्लास्टिक व्यवस्थापन विषयावर १ एकत्रित प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबविला गेला. तळजाई, पद्मावती, वनशिव, गणेश मळा आणि रामनगर या ५ वस्त्यांमधून प्रत्येकी एक जनजागृतीचे सत्र राबविले गेले.

## आगामी उपक्रम

**१. ८ मार्च: इ-कचरा व प्लास्टिक संकलन अभियान- प्रभाग क्र. ३५ (सहकारनगर व पद्मावती)**

**२. ९ एप्रिल: शाळांमध्ये राबविल्या गेलेल्या स्पर्धांचे बक्षीस वितरण**

# फोटो गॅलरी






## जनजागृती प्रकल्प





## सेवासंगम प्रदर्शनातील स्टॉल्स






## इ-कचरा आणि प्लास्टिक संकलन मोहीम

# पाणथळ परिसंस्था




दि. २ फेब्रुवारी हा दिवस जागतिक पाणथळ जागा दिवस म्हणून ओळखला जातो.

पाण्याने व्यापलेली जागा किंवा अतिरिक्त पाणी मुरल्यामुळे तयार झालेली दलदलीची जागा म्हणजे पाणथळ जागा होय. नदीकिनारी किंवा समुद्राच्या जवळपास अशा जागा तयार होतात. दलदलीच्या जागा, गोड्या पाण्याजवळील , खाऱ्या पाण्याजवळील अशा अनेक प्रकारच्या पाणथळ जागा असतात.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पर्यावरणातील प्रत्येक घटक मोलाची कामगिरी बजावत असतो. पाणथळ जागांमध्ये असणारी जैव विविधता सृष्टीचक्रात महत्वाची भूमिका बजावते. याशिवाय प्रदूषके आणि कार्बन डायऑक्साईड शोषून हवेची गुणवत्ता सुधारते. पाणथळ जागी काही वैशिष्ट्यपूर्ण वनस्पती आणि प्राणी असतात जे इतर कोणत्याही ठिकाणी आढळत नाहीत. यामुळे अशा जागा पर्यटनाचे आकर्षण केंद्र असतात.

याशिवाय पुराच्या पाण्यापासून



भोवतालच्या प्रदेशास संरक्षण मिळते.

पाणथळ जागांमध्ये परिसरातील पाण्यातून गाळ वाहून आणला जातो त्यात आरोग्यास अपायकारक असणारी जड मूलद्रव्ये सुद्धा असतात. पाणथळ जागेतील वनस्पती ही मूलद्रव्ये शोषून घेतात. पर्यायाने आजूबाजूच्या परिसरातील मातीमध्ये, पाण्यामध्ये जड मूलद्रव्यांचा अंश कमी प्रमाणात राहतो.

असे अनेक फायदे असणारी एक परिसंस्था सांभाळणे हे आपले कर्तव्य आहे.



पर्यावरण मंत्रालयातर्फे झालेल्या पाणथळ जागांच्या परीक्षणानुसार काही माहिती समोर आली ती आज या लेखातून देत आहे.

पर्यावरण मंत्रालयाने दिलेल्या प्रस्तावानुसार तज्ञांची एक समिती तयार करण्यात आली. या समितीच्या अहवालानुसार देशातील पाणथळ प्रदेशांची क्रमवारी करण्यात आली.

याअंतर्गत केओलादेव; भरतपूर, कच्छचे रण, सुंदरबन येथील पाणथळ जागा या 'अ' क्रमवारी मध्ये सामवल्या आहेत तर हिमाचल प्रदेशातील पोंग बांध, केरळ येथील वेम्बनाद तलाव, ओरिसातील चिलीका यासारख्या पाणथळ जागा या 'ब' क्रमवारीत येतात.

तर ' क' क्रमवारी मध्ये गंगेच्या उत्तरेकडील प्रदेशात असणाऱ्या पाणथळ, तामिळनाडू मधील कैलिमार, कोकरे बेलूर ,मध्य प्रदेशातील भोज यांचा समावेश करण्यात आला.

१९७१ साली झालेल्या रामसर परिषदेत देशभरातील एकूण २६ पाणथळ जागा या संरक्षित म्हणून घोषित केले आहे. यात राजस्थान येथील सांभार तलाव समाविष्ट केला आहे.

सांभार तलाव हा खाऱ्या पाण्याचा तलाव म्हणून प्रसिद्ध आहे. दरवर्षी परदेशातून येथे लाखो पक्षी स्थलांतरित होत असतात. समितीच्या माहितीनुसार या तलावाची क्रमवारी ही सगळ्यात खाली केली गेली आहे. या वर्षी या तलावात विहारास आलेले १८००० पक्षी मृत्युमुखी पडले. याचा अधिक अभ्यास केला असता असे दिसून आले की, मुख्यत्वे या पक्षांचा मृत्यू मज्जातंतूंच्या आजाराने झाला.

याच्या सखोल अभ्यासानुसार कारखान्यातून पाण्यात सोडली जाणारी रसायने, पाण्यातील क्षारांचे वाढते प्रमाण, पाण्यातील प्राणवायूची कमतरता, तर इतर प्राण्यांनी केलेली शिकार, विषारी शैवाल अनेक कारणे समोर आली.

आपल्या देशात येणाऱ्या स्थलांतरित पक्षांचा मृत्यू हा मानवी निष्काळजीमुळे व्हावा ही बाब सृष्टीचक्राच्या दृष्टीने अतिशय काळजीची आहे. याची काळजी घेणे ही फक्त सरकारची नाही तर आपल्या सगळ्यांची जबाबदारी आहे.

**संकलित**

- **सौ. राखी कुलकर्णी**
**धायरी, पुणे**

# सेवा दूत - गाडगे बाबा



गाडगे बाबा म्हटलं की मूर्ती डोळ्यांसमोर येते,
"वेश बावळा परी, अंतरी नाना कळा"
गाबुळ शहाणपणाचे मूर्तिमंत उदाहरण...
डेबू - एक अतिसामान्य, निरक्षर, कष्ठकरी कुटुंबातील मुलगा. अल्पावधीतच पितृछत्र हरवले. व्यसनाधिनतेमुळे कर्जाच्या व्याजातच कुटुंब बुडालेले. घर सोडून आई सोबत मामाच्या घरी आश्रित म्हणून नवीन आयुष्याची सुरुवात केली. शेतात काबाडकष्ट करणे हेच जीवन. पण आत मनामध्ये विधिलिखित काही वेगळेच होते. डेबू त्याही परिस्थितीमध्ये सेवा व स्वच्छता हे दोन विषय घेऊन समाजप्रबोधनाचे काम करत होता.
अल्पावधीतच डेबूचा 'गाडगे बाबा' झाला. अंगात गोधडीचा सदरा, धोतर/लुंगी, डोक्याला चिंधी गुंडाळलेली आणि गाडग्याचे बुड (खापर) जेवणाच्या वेळी थाळी म्हणून आणि इतर वेळी डोक्यावर शिरस्त्रानासारखे.

'खराटा' - म्हटलं तर शस्त्र, माध्यम, सोबती! हातात सदैव खराटा! घेऊन जाईल त्या ठिकाणचा परिसर स्वच्छ करणे, हेच काम केले. स्वतःच्या कृतीमधून समाजाला स्वच्छतेचा संदेश दिला. स्वतः निरक्षर परंतु समाज शिकला पाहिजे, शहाणा झाला पाहिजे, अंधश्रद्धेचा बळी ठरू नये, निस्वार्थी व्हावा हाच ध्यास सतत घेतला. अनेक शैक्षणिक संस्था/ धर्मशाळा उभारल्या. पण स्वतःचा एकही नातेवाईक, कुटुंबीय त्या संस्थांचा सदस्य करून घेतला नाही. त्यांना यापासून दूरच ठेवले. निस्वार्थी सेवाभाव आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत जोपासला.

सेवा धर्म महान... खरोखर सेवा धर्म महान!
वैभव शिखरी राष्ट्र न्यावया प्रशस्त हा सोपान...
सेवा धर्म महान... हाच संदेश समाजाला दिला.

व्यसनाधीनता, अज्ञान, निरक्षरता, अंधश्रद्धेच्या खाईत बुडालेल्या समाजाला स्वच्छता, सेवा, निस्वार्थीभाव व साक्षरतेच्या माध्यमातून बाहेर काढण्याचा बाबांनी आटोकाट प्रयत्न केला तसेच त्यासाठी आपले आयुष्य सत्कारणी लावले, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.



समाजप्रबोधनाचे त्या काळातील प्रभावी साधन म्हणून बाबांनी किर्तन करायला प्रारंभ केला. कोणतेही वाद्य, साधन - संगीत याशिवाय त्यांचे किर्तन चालत असे. यामधून त्यांनी समाजाला शब्द प्रभावित संदेश दिला.

"मनी नाही भाव, देवा मला पाव,
देव अशाने भेटायचा नाही रं,
देव बाजारचा भाजीपाला नाही रं||"

त्यांनी आयुष्यभर समाजामध्ये भाव जागरणाचे काम प्रभावीपणे केले. पंढरपूरला जाऊन विठोबाचे दर्शन घेणे याला प्राधान्य न देता त्यांनी नेहमी मंदिर परिसराची स्वच्छता करणे, यालाच अधिक प्राधान्य दिले. व त्यातच पांडुरंगाचे दर्शन घेतले.
समाजरूपी परमेश्वराची सेवा स्वच्छतेच्या माध्यमातून अखंडपणे केली नव्हे तर ते त्यांनी आपले जीवनध्येयचं बनवले होते.
परिस्थितीने घडवलेला हा हटयोगी, समाजशिक्षक, समाजसेवक, देवदूत १८७६ ला अमरावती जिल्ह्यातील शेणगाव (शेंडगाव) येथे परिट समाजाच्या अतिसामान्य घरात जन्माला आला.



डेबू या नावाने आयुष्यभर स्वच्छतेचे व्रत घेऊन लोकांची सेवा करत करत २० डिसेंबर १९५६ या दिवशी संत गाडगे महाराज म्हणून अनंतात विलीन झाला.
रविन्द्रनाथ टागोर यांनी इंग्रजी कवितेत म्हटल्याप्रमाणे,

" O, GOD
Though has sent Thy messengers to this pitiless world,
They taught us to forgive and love,
They are our Masters."
यापैकी एक गाडगे बाबा होते. कोटी कोटी प्रणामासह ...

- **सौ. शोभा मोहन कुलकर्णी**
**व्यंकटेश शर्विल सोसायटी,**
**धायरी, पुणे**


# विज्ञान दिनाचे महत्व




National Science Day

आजपासून ८६ वर्षांपूर्वी म्हणजे २८ फेब्रुवारी १९२८ या दिवशी डॉ. सी. व्ही. रामन यांनी “रामन इफेक्ट” या नावाने जगप्रसिद्ध असलेला भौतिकशास्त्रातील प्रकाशाच्या प्रारणांशी संबंधित प्रबंध सदर केला. परिणाम स्वरूप १९३० मधील भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले.

या घटनेचे औचित्य व स्मरण म्हणून हा दिवस भारतात “राष्ट्रीय विज्ञान दिन” म्हणून साजरा केला जातो. “नोबेल” पुरस्कार मिळवणारे डॉ. सी. व्ही. रामन श्वेतवर्णीय नसलेले जगातील पहिले शास्त्रज्ञ होते. त्याचप्रमाणे आशिया खंडात विज्ञान या विषयात नोबेल मिळवणारे ते पहिले शास्त्रज्ञ होते.





इतके महत्त्वपूर्ण संशोधन भारतात, भारतीय व्यक्तीकडून, पारतंत्र्याच्या काळात करण्यात आले ही खरंच अभिमानास्पद बाब आहे. परंतु आज भारतीयांच्या जीवनशैलीत व विचार पद्धतीत वैज्ञानिक दृष्टीकोन मात्र हवा तेवढा दिसत नाही. २१ व्या शतकात आपण पावलो पावली विज्ञान-तंत्रज्ञानाचा वापर करत असतो, अभाव आहे वैज्ञानिक दृष्टिकोनाचा. म्हणूनच विज्ञान दिनांसारख्या वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविणाऱ्या दिवसांचे महत्त्व वाढते.



विज्ञान दिनाचे औचित्य साधून विज्ञानप्रेमी संघटना व व्यक्ती विज्ञान प्रसार व प्रचाराचे कार्य निस्वार्थी वृत्तीने करत असतात. त्यायोगे समाजातील सर्व घटकांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्याचे काम संवाद, व्याख्याने, प्रयोग इत्यादी कार्यक्रमांद्वारे केले जाते.

विज्ञानाचे मानवी जीवनातील महत्त्व जनसामान्यांना समजावे म्हणून विज्ञान प्रदर्शन, वक्तृत्व-निबंध स्पर्धा इत्यादींचे आयोजन केले जाते. नवनवीन शोध व तंत्रज्ञान याविषयी माहिती देण्यासाठी परिसंवाद आयोजित केले जातात.



विज्ञान प्रसारासोबतच नागरिकांमध्ये चौकस बुद्धीचा विकास व्हावा हाही या दिवसाचा उद्देश असतो. या अनुषंगाने वर्ष १९९९ पासून दरवर्षी विज्ञान दिनासाठी एक घोषवाक्य अथवा विषय ठरविला जातो. जसे वर्ष १९९९ साठी विषय होता, ‘मूलभूत संशोधनाबाबत आवड निर्माण करणे इत्यादी.

आपण सर्वांना ह्याची जाणीव आहे की, जे सुखी, समाधानी व सुरक्षित आयुष्य मानव आज जगत आहे, ते काही मोजक्या मानवांनी म्हणजेच शास्त्रज्ञांनी केलेल्या मेहनतीचे फळ आहे.

या विज्ञान दिनी विज्ञान प्रसार व प्रचाराचे कार्य हाती घेऊया व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा स्वतः अंगीकार करून इतरांना त्यासाठी प्रोत्साहीत करूया.

जय जवान! जय किसान! जय विज्ञान!

जय हिंद!

राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या शुभेच्छा!

“Go Green, Save Earth”



**- सानिया विलासराव जगताप**

**संत तुकाराम इंग्लिश मिडीयम स्कूल, कात्रज, पुणे**

# बागेचे सोबती





आम्हा दोघांना झाडांची खूप आवड आहे. कोथरुडला असताना आमचं घर हे तळमजल्यावर होतं आणि बागेसाठी खूप जागा होती. तिथे आम्ही जास्वंद, चाफा , सोनटक्का, अबोली, अनंत, गुलाब, तगर, मोगरा, काकडा इत्यादि फुलांची आणि पेरु, आवळा, सुरण, अळू, पपई , कढीपत्ता इत्यादि फळ आणि इतर झाडांची लागवड केली होती. सुरुवातीला स्वतः खणून खूप सारी माती आणि खत, कीटकनाशकं इत्यादि मिळून जमीन तयार केली आणि झाडं लावली. घरातला सर्व प्रकारचा ओला कचरा आम्ही तिथे जिरावायचो. मग ती भाज्यांची देठे, फळांची साले, निर्माल्य, चहाचा चोथा, खरकटे अगदी सर्व जिरवायचो.

१२ वर्ष, जो पर्यंत आम्ही तिथे रहात होतो थोडाही ओला कचरा आम्ही बाहेर टाकला नाही. त्यामुळे जमीन सुरुवातीला जी मुरमाड होती ती सुपीक बनली. निसर्गाने आम्हाला यामुळे भरपूर फुले , फळे दिली. फुलाचा पुडा कधी आम्हाला विकत आणलेला आठवत नाही. इतका लळा आम्हाला होता की ते घर सोडताना जेवढं वाईट वाटलं नाही तेवढं झाडाना सोडून धायरी मधे येताना वाटलं.

कोथरुडला जितक्या प्रकारची झाडं होती ती सर्व मी आमच्या टेरेस मध्ये लावली आहेत. आम्ही जड कुंड्या ना वापरता , पीव्हीसी चे मोठे पिंप वापरले . त्याला सगळीकडून छिद्रे पाडली जेणेकरून हवा खेळती राहील, कुंडी भरताना सर्वात खाली थोडे १०/१२ विटांचे तुकडे, नंतर नारळाच्या शेंड्या, थोडे कंपोस्ट आणि थोडी माती भरली. त्यात झाडे लावली. इथेही आम्ही अन्नाचे खरकटे आणि खरकटे पाणी आम्ही या झाडांना घालतो. त्यामुळे अतिरिक्त पाणी थोडेच लागते.

फिश टँक चे पाणी सुद्धा न फेकता झाडाना देतो. ६०% ओला कचरा पण आम्ही या झाडांमध्ये जिरवतो. या सोसायटीमध्ये ओला कचराव्यवस्थापनासाठी सोय आहे. तिथे कंपोस्ट तयार होते त्यामुळे उरलेला ओला कचरा जो आम्ही बाहेर देतो तो असाच रस्त्यावर फेकला जात नाही.

इथेही आत्ता ५-६ प्रकारची जास्वंद, जुई, मोगरा, जाई, कोरांटी इत्यादि फुलझाडे आहेत. कडीपत्ता, कापूस , मिरची इत्यादि २०-२२ प्रकारची झाडे आहेत. ३६५ दिवसातून १०-१२ वेळेला फक्त आम्हाला फुलं विकत आणायला लागतात. टेरेस मस्त हिरवीगार दिसते, खूप समाधान वाटतं.

याशिवाय आम्ही पाण्याचे नियोजनही प्रयत्न पूर्वक चांगलं केलं आहे. ठिबक सिंचन केलं आहे. त्यामुळे उन्हाळ्यात जास्त पाणी वापरलं जात नाही.

इतर पाणी म्हणजे वॉशिंग मशीन मधील बाहेर पडणारे साबणाचे पाणी जेवढं शक्य आहे ते आम्ही सांडपाणी वापरासाठी वापरतो, टेरेस शक्यतो आम्ही पुसतो पण अगदीच हवं असेल तर टेरेस धुण्यासाठी पण त्या पाण्याचा उपयोग करतो.

आम्ही अतिरिक्त पाण्याची टाकी बसवली आहे. त्यातून खूप कमी दाबाने पाणी येतं. एक बाथरूम आणि वॉश बेसिन ला या टाकीतून पाणी दिले आहे. कमी दाबा मुळे आपोआपच पाणी कमी वापरलं जातं.

अनेक लहान लहान कृतींमधून पाणी वाचवायचा प्रयत्न करतो.

निसर्ग देत आहे म्हणून ओरबाडून न घेता समाधानी वृत्तीने त्याची परतफेड करण्याचा एक छोटासा प्रयत्न आम्ही करतो.

**- सौ. मनीषा काळे**
**व्यंकटेश शर्विल सोसायटी,**
**धायरी, पुणे**

# पूर्णमच्या कामाबद्दलच्या प्रतिक्रिया

‘ पूर्णम इकोव्हिजन फाऊन्डेशन ‘ या संस्थेच्या वर्धापनदिनाला वक्ता म्हणून मला बोलावून सन्मानित केल्याबद्दल मी आपला ऋणी आहे .

पर्यावरणामध्ये असलेल्या विविध प्रकारच्या गरजा ह्या तंत्रज्ञान आणि प्रशिक्षित मनुष्यबळाने पूर्ण करणे हे आव्हानात्मक काम आहे. त्यामधील स्वच्छता किंवा कचरा व्यवस्थापनामध्ये काम करणे आजही उत्तम दर्जात्मक काम म्हणून सहज स्वीकारले जात नाही . या पार्श्वभूमीवर पाय रोवून पुण्यासारख्या मोठ्या महानगरामध्ये कचरा व्यवस्थापन करणारी आस्थापना उभी करण्याचे आणि यशस्वीपणे चालवण्याची आपले प्रयत्न योग्य आणि प्रशंसेस पात्र आहेत . या विषयावर सातत्याने स्वयंपूर्ण संस्था उभारून त्यांना जनसमर्थन मिळवून देणे हे दुहेरी कार्य आपल्या संस्थेने योग्यरीत्या केले आहे असे मला दिवसभराचे सर्व कार्यक्रम पाहिल्यानंतर जाणवले .

आपल्याला मिळालेले सर्व सहकारी उत्तम व दर्जावान आहेत . आपल्या अभिनव संकल्पना प्रत्यक्षात आणण्यास अशाच प्रकारच्या मनुष्यबळाची आवश्यकता असते .

लोकांच्या प्रत्यक्ष सहभागातून त्यांच्याकडच्या उपयोगात नसलेल्या वस्तूंना योग्य प्रकारचा मार्ग उपलब्ध करून देणे . आपल्या वरील विश्वासाच्या माध्यमातून त्या वस्तूंना गोळा करणे . त्यावर योग्य मनुष्यबळाच्या सहकार्याने प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करणे योग्य बनविणे काहींचा उपयोग बदलून इतर उपयोगी वस्तू तयार करणे . आणि परत अनेकदा आपल्या जनसंपर्काच्या माध्यमातून या वस्तूंसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देणे . हे सर्व काम करणे आजच्या विकसनशील भारताची आवश्यकता आहे . यातून रोजगार निर्मिती होत आहे आणि बहुमोल नैसर्गिक स्रोत अविरतपणे उपयोगामध्ये येत आहेत !

आपल्यासर्वांच्या या निसर्ग सेवेबद्दल आपल्या सर्वांचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे !

अशा प्रकारचे प्रकल्प निरंतरपणे चालविण्याच्या चिकाटी बद्दल आपलं विशेष आभार . निसर्गदेवता आपल्याला आपल्या ह्या सर्व उद्योगांमध्ये अपेक्षित यश देवो !



- **श्री विद्याधर बालवलकर**

**संचालक, पर्यावरण दक्षता मंच, ठाणे**

पूर्णमशी माझा संबंध साधारण चार वर्षांपूर्वी आला. एका प्रदर्शनामध्ये माझी राजेशजींबरोबर ओळख झाली आणि त्यांचे काम आणि जिद्द बघून असे ठरवले की आपण सुद्धा त्यांच्या कामात सहभागी व्हायचे. प्लास्टिक आणि E-waste center सुरु करायचे. त्याप्रमाणे आमच्या सोसायटी मध्ये एक केंद्र सुरू केले. आसपासच्या सोसायटीमध्ये पत्रके वाटणे, माहिती देणे सुरू केले. आज अखेर आनंदनगर, महागणेश कॉलनी, शेफालिका सोसायटी, फूड्स कॉर्नर अशी केंद्रे सुरू झाली आहेत. पूर्णमशी काम करताना एक समाधान मिळते की ढासळत्या पर्यावरणासाठी आपण काही तरी वाटा उचलू शकतो. अनेक नवीन ओळखी झाल्या, नवनवीन कल्पनांची ओळख झाली. पूर्णम बरोबर हा प्रवास असाच सुरू राहावा हीच इच्छा.

**- श्री. सुधीर तळवलकर,**
**स्वयंसेवक, पूर्णम इकोव्हिजन फाऊंडेशन**

## *सहयोगी संस्था*

ARAI Progress through Research

Mahindra Rise.

Cummins

GRAMEEN SHRAMIK PRATISHTHAN

HYATT PUNE

Janwani जनवाणी

KPIT

Cybage Delivering Value Scientifically

MIDC //उद्यमात सकल समृध्दिः//

पुणे महानगरपालिका

SEVA SAHAYOG Celebrating Humanity

॥वसुधैव कुटुम्बकम्॥

ROTARY INTERNATIONAL

सेवावर्धिनी

## *पूर्णम इकोव्हीजन फाउंडेशन*

**सर्व्हे नं ५, "मातोश्री" बंगला, चिन्मय कॉलनी, जनसेवा मेडिकलची गल्ली, कर्वेनगर, पुणे- ५२**

**संपर्क क्रमांक- ०२०-२५४७३७५७, इ-मेल- contact@poornamecovision.org**

**वेबसाईट- www.poornamecovision.org**